D.A.V. PUBLIC SCHOOL ,THANE
SESSION2021-2022
PERIODIC TEST II
SUBJECT- MARATHI

STD –VIII **MAX.MARKS -40**
DATE - 29/09/21 **TIME -2 HRS.**

सूचना :

- **प्रश्नपत्रिकेत दोन विभाग आहेत .दोन्ही विभाग सोडविणे आवश्यक.**
- **विभाग अ = २० गुण . गद्यउतारा ,पद्यांश आणि व्याकरण**
- **विभाग ब = २० गुण . पाठावरील प्रश्न आणि पत्रलेखन**

विभाग -अ

प्रश्न १} खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्नाची उत्तरे योग्य पर्याय निवडून लिहा. **५**

आमच्या गावची विहीर गावाच्या मध्यभागी आहे .गावक-यांनी श्रमदान करून ही विहीर बांधली .या विहिरीत नेहमी पाणी असते . त्यामुळे लोक तेथे सतत वावरत असतात . सकाळी स्त्रिया पाणी भरतात . पाणी भरताना त्या छान गप्पा मारतात ; म्हणून स्त्रियांचे हे एक आवडते ठिकाण आहे . दमलेला वाटसरू विहीर पाहून आनंदित होतो . ही विहीर त्याची तहान भागवते . या विहिरीवर सर्वधर्मांचे लोक येतात .आमची विहीर जातीयता पाळत नाही .

१ गावक-यांनी विहीर कशी बांधली ?

अ) लोकांकडून पैसे घेऊन ब)कर्ज काढून क) श्रमदान करून ड)भानगडी करून

२ लोक विहिरीजवळ सतत का वावरतात ?

अ)विहीर खोल असल्यामुळे ब)सतत पाणी असल्यामुळे क) पाणी गोड असल्यामुळे ड)पाणी काढण्यासाठी

३ विहिरीवर पाणी भरताना स्त्रिया काय करतात ?

अ) नाचतात ब) गातात क) गप्पा ड) रडतात.

४ वाटसरू विहिरीला पाहून आनंदित का होतो ?

अ)विहिरीचा आकार बघून ब) विहिरीतील पाणी बघून क) त्याची तहान भागवते ड) विहिरीची तहान भागून

५) 'आवडते' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द लिहा .

अ) भागवते ब) नावडते क) गाजवते ड) घडवते

प्रश्न २} खालील वाक्य सूचनेनुसार सोडवा. **१०**

अ) कोणतेही दोन प्रश्न सोडवा .

१) मोराचा पिसारा रंगीबेरंगी असतो . (विशेषण ओळखा)

२) तुम्हाला जेवण दिले आहे . (सर्वनाम ओळखा)

३) प्रतापगड खूप उंचावर आहे . (नाम ओळखा)

ब) कोणतेही दोन प्रश्न सोडवा

१) रस्त्यावर प्रचंड गर्दी आहे . (काळ ओळखा)

२) रमेश तबला वाजवेल . (काळ ओळखा)

३)तिने दुपारचे सर्व जेवण केले . (भविष्यकाळ करा.)

क) समानार्थी शब्द लिहा . (कोणतेही दोन)

१)तीर २) बाग ३) पाणी

ड) विरुद्धार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन)

१) ऊन २) ओला ३) सुगंध

इ) वचन बदला . (कोणताही एक)

१) रंग २) सरी

ई) लिंग बदला . (कोणताही एक)

१)कुमारी २) घोडा

प्रश्न ३} खाली दिलेले कडवे वाचून त्याखालील प्रश्नाची उत्तरे लिहा. ५

आभाळाची अम्ही लेकरे ,काळी माती आई
जात वेगळी नाही आम्हा धर्म वेगळा नाही ||
श्रमगंगेच्या तीरावरती
कष्टक-यांची अमुची वसती
नाव वेगळे नाही आम्हा गाव वेगळा नाही ||
इमान आम्हा एकच ठावे
घाम गाळुनी काम करावे
मार्ग वेगळा नाही आम्हा स्वर्ग वेगळा नाही ||

प्रश्न १) आभाळाची लेकरे कोणाला म्हटले आहे ?

अ) कष्टक-यांना इ) मुलांना

आ) मुलींना ई) शिक्षकांना

प्रश्न २) काळ्या मातीला कोणती उपमा दिली ?

अ) आई इ) मुलगी

आ) बहीण ई) देवी

प्रश्न ३) श्रमगंगेच्या तीरावर कोणाची वस्ती आहे ?

अ) कोळ्यांची इ) कष्टक-यांची

आ) माळ्यांची ई) नोकरांची

प्रश्न ४) कष्टक-यांना काय ठावे आहे ?

अ) इमान इ) बेईमान

आ) प्रामाणिक ई) अप्रामाणिक

प्रश्न ५)घाम गाळुनी काय करावे ?

अ) खेळावे इ)बसावे

आ) काम ई)फिरावे

विभाग ब

प्रश्न ४} खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ५) ५

१) सर्वांनी कोणाकडे तक्रार केली?

२) या स्पर्धेच्या युगात अमुल्य शिकवण कोणी दिली आहे ?

३) लेखक बागेत काय काय करायचे ?

४)लालभडक माती पासून काय तयार केल्या जायच्या?

५)लेखकाचे प्राथमिक शिक्षण कोठे झाले ?

६)प्रतिभेची प्रभात कोणत्या क्षितिजावर उगवली आहे?

प्रश्न ५} योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा. (कोणतेही ४) ४

१) तो झाडाच्या --------घोडा बांधून ठेवायचा .

(मुळीला /खोडाला/फांदीला)

२)कला गुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची ----------.

(सकाळ/ दुपार/ प्रभात)

३) आमची चित्र नदीच्या पोटात ---------- व्हायची.

(गायब/ गडप / बेभान)

४) कोकणातला ----------पाहत काही वेळ इथेच शांत उभं राहायला हवं.

(समुद्र / निसर्ग / पाऊस)

५) मला ----------पुरस्कार मिळाला .

(खेलरत्न ,अर्जुन ,ध्यानचंद ,द्रोणाचार्य)

प्रश्न ६} खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ३) ६

१) लेखकाने सांगितलेले व्यायामाचे महत्त्व लिहा .

२) जिगरबाज भटके शब्दसमूहाचा अर्थ स्पष्ट करा .

३) आपण सारे शरीररूपी राज्याचे सेवक आहोत या विधानाबाबत तुमचे मत लिहा .

४) पुढील ओळीचा भावार्थ तुमच्या शब्दात लिहा .

"इमान आम्हा एकच ठावे घाम गाळुनीकाम करावे."

प्रश्न ७} आपल्या गावात उत्साहाने साजरा केल्या गेलेल्या गणेश उत्सवाचे वर्णन करणारे पत्र आपल्या मित्र किंवा मैत्रिणीला लिहा. ५

किंवा

आपल्या गावात आलेल्या सर्कशीचे वर्णन करणारे पत्र आपल्या मित्र किंवा मैत्रिणीला लिहा.
